# जय कॉर्प लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालयः** ए–३, एमआयडीसी इंडस्ट्रिअल एरिया, नांदेड–४३१६०३, महाराष्ट्र.
**सीआयएनः** L17120MH1985PLC036500
**वेबसाईटः** www.jaicorpindia.com, • **गुंतवणूकदारांसाठी इ–मेलः** cs2@jaicorpindia.com
**फोनः** (०२२) ६११५ ५३०० • **फॅक्सः** (०२२) २२८७ ५१९७

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, नोंदवह्या समाप्ती आणि दूरस्थ ई–मतदानाची सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ३०व्या एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले सामान्य व विशेष कामकाज करण्यासाठी कंपनीच्या सदस्यांची ३०वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') बुधवार, दिनांक २३ सप्टेंबर २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात होईल.

३०व्या एजीएमची सूचना आणि २०१४–१५ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईटवर **(http://www.jaicorpindia.com/)** येथे उपलब्ध आहे आणि ज्यांचा ई–मेलचा पत्ता उपलब्ध आहे अशा सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत आणि ज्यांचा ई–मेलचा पत्ता उपलब्ध नाही अशा सर्व सदस्यांना छापील स्वरूपात पाठविण्यात आले आहेत. कंपनीने परवानगीप्राप्त माध्यमाद्वारे एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल पाठविण्याचे काम २९ ऑगस्ट २०१५ रोजी पूर्ण केले आहे.

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ९१ अन्वये कंपनीची सभासद नोंदणी आणि भाग हस्तांतरण नोंदवही गुरूवार दिनांक १७ सप्टेंबर २०१५ पासून बुधवार दिनांक २३ सप्टेंबर २०१५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील. सदर सभेत प्रेफरन्स आणि इक्विटी लाभांश घोषित करण्यात आल्यास तो बुधवार दिनांक १६ सप्टेंबर २०१५ रोजी कामकाजाच्या अखेरीस ज्यांची नावे सभासद नोंदणीच्या नोंदवहीवर असतील अशा सदस्यांना देण्यात येईल.

कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०८ अन्वये, कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या नियम २०, सुधारित आणि सूचिबध्दता कराराच्या कलम ३५ बी अन्वये, कंपनीने भौतिक आणि डि मटेरिअलाईज्ड अशा सर्व सभासदांसाठी दूरस्थ ई–मतदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सदस्यांना अधिक सूचना देण्यात येत आहे कीः (१) ते एजीएममध्ये होणाऱ्या सर्व कामकाजांसाठी कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड ('कार्वी'), कंपनीचे रजिस्ट्रार व समभाग हस्तांतरण एजन्ट यांनी त्यांचे पोर्टल **https://evoting.karvy.com** द्वारा देऊ केलेल्या दूरस्थ ई–मतदान सुविधेद्वारे त्यांचे मतदान करू शकतात. वार्षिक अहवालासोबत ई–मतदानाची पद्धतीची तपशिलवार माहिती/सूचना पाठविण्यात आल्या आहेत, (२) दूरस्थ ई–मतदानाला शनिवार दिनांक १९ सप्टेंबर २०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता सुरूवात होईल, (३) दूरस्थ ई–मतदान मंगळवार दिनांक २२ सप्टेंबर २०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता बंद होईल. ह्या तारखेनंतर व वेळेनंतर दूरस्थ ई–मतदान पद्धतीने मदतान करता येणार नाही. (४) इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे दूरस्थ ई–मतदानाची पात्रता निश्चित करण्यासाठी अंतिम मुदतीची तारीख बुधवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१५ ही आहे, (५) एजीएमची सूचना पाठविण्यात आल्यानंतर समभाग विकत घेणाऱ्या आणि कंपनीचे सदस्य होणाऱ्या व्यक्ती कार्वीचे श्री. पी. ए. व्हर्गिस यांच्याकडे ई–मेल पाठवून किंवा '७' मध्ये देण्यात आलेल्या पत्यावर पत्र पाठवून लॉगइन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतील. (६) कंपनीच्या वेबसाईटवर **http://www.jaicorpindia.com/investor/annualreports.html; http://www.jaicorpindia.com/investor/announcements.html** येथे आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर **https://evoting.karvy.com;** येथे एजीएमची सूचना प्रकाशित करण्यात आली आहे. (७) ई–मतदानासंबंधी कोणत्याही चौकशीसाठी सदस्य कार्वी यांच्या वेबसाईटवरील 'हेल्प व एफएक्यू' भाग पहावा. काही तक्रार असल्यास त्यांनी श्री. पी. ए. व्हर्गिस, जनरल मॅनेजर, कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड, युनिटः जय कॉर्प लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गचीबॉवली, फायनानशीयल डिस्ट्रीक्ट, नानकरामगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२, फोनः +९१–०४०–३३२१५४२४, ई–मेलः **varghese1@karvy.com** येथे संपर्क साधावा.

एखाद्या सदस्याने दूरस्थ ई–मतदानाद्वारे मतदान केले नसल्यास आणि तो एजीएमच्या ठिकाणी उपस्थित असल्यास त्याला त्याचे मतदान करण्यासाठी मतपत्रिका देण्यात येईल. दूरस्थ ई–मतदानाद्वारे त्याच्या/तिच्या मतदानाचा अधिकार बजावल्यानंतर देखील एखादा सदस्य एजीएममध्ये सहभागी होऊ शकतो परंतु त्याला एजीएममध्ये मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

अंतिम मुदतीच्या तारखेला ज्या व्यक्तीचे नाव सभासद नोंदणीच्या नोंदवहीवर किंवा डिपॉझिटरीज यांचेपाशी असलेल्या लाभधारक मालकांच्या नोंदवहीवर असेल अशाच व्यक्तींना फक्त दूरस्थ ई–मतदानाची त्याचप्रमाणे एजीएममध्ये मतदान करण्याची सुविधा उपलब्ध असेल.

संचालक मंडळाच्या आदेशाने
करिता **जय कॉर्प लिमिटेड**
सही/–
कंपनी सचिव

दिनांक : ३१/०८/२०१५
ठिकाण : मुंबई